लोकमत

# ‘जेडीआयईटी’च्या पाच विद्यार्थ्यांची कॅप जेमिनी, विप्रो या बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये निवड

लोकमत न्यूज नेटवर्क

**यवतमाळ :** स्थानिक जवाहरलाल दर्डा एज्युकेशन सोसायटीद्वारा संचालित जवाहरलाल दर्डा अभियांत्रिकी महाविद्यालयातील सत्र २०२१-२२ मध्ये उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांची व्हर्च्युअल ऑफ कॅम्पस ड्राइव्हद्वारे निवड करण्यात आली. कॅप जेमिनी व विप्रो या बहुराष्ट्रीय कंपनीकडून ही निवड झाली.


सुरज वर्मा


आनंद डगवार


शिवम चौधरी


तिलक पराजिया


आनंद पांडे

यामध्ये कॉम्प्युटर सायन्स अँड इंजिनिअरिंग शाखेतील सुरज वर्मा, आनंद डगवार यांची कॅप जेमिनी पुणे, तर शिवम चौधरी, तिलक पराजिया, आनंद पांडे या तिघांची विप्रो या बहुराष्ट्रीय कंपनीत निवड झाली. कंपनीद्वारे ऑनलाइन आणि व्हिडिओ कॉन्फरन्सिंग पद्धतीने पार पडलेल्या व्हर्च्युअल ऑफ कॅम्पस ड्राइव्हमध्ये जेडीआयईटीतील इंजिनिअरिंग शाखेच्या पात्र विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. सर्वप्रथम विद्यार्थ्यांची ऑनलाइन अॅप्टिट्यूड टेस्ट घेण्यात आली. त्यानंतर टेक्निकल इंटरव्ह्यू व पर्सनल इंटरव्ह्यूच्या फेऱ्या घेण्यात आल्या. कॉम्प्युटर सायन्स अँड इंजिनिअरिंग शाखेच्या पाच विद्यार्थ्यांची अंतिम निवड झाली. कॅप जेमिनी कंपनीत निवड झालेल्या विद्यार्थ्यांना चार लाखांचे वार्षिक पॅकेज, ऑनलिस्ट इंजिनिअर या पदावर रुजू करण्यात येणार आहे. विप्रोमध्ये निवड झालेल्या विद्यार्थ्यांना ३.५ लाख वार्षिक पॅकेज व प्रोजेक्ट इंजिनिअर या पदावर रुजू केले जाणार आहे. महाविद्यालयातर्फे निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे कौतुक करण्यात आले आहे.